विभागाच्या नियंत्रणाखालील संस्थामध्ये केंद्र शासन योजना , केंद्र राज्य -योजना , खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावरील प्रकल्प, सोयीसुविधा निर्माण करणे, इत्यादी बाबतचे प्रस्तावाबाबत

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन परिपत्रक, क्रमांक : एमओयु -२०१९/प्र.क्र.१८९ /प्रशा-१

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक : ०२ ऑगस्ट, २०१९

वाचा : १. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक ०४/०६/२०१४/(१) दिनांक १६.०४.२०१४

२. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक विअप्र - २०१३ / प्र.क्र. ३० / २०१३ / विनियम, भाग -२, दिनांक १७.०४.२०१५

शासन परिपत्रक :-

विभागाच्या नियंत्रणाखालील संस्थांमध्ये केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण वा अन्य विभागाने घोषित केलेल्या केंद्र सहाय्यित, केंद्र राज्य हिस्सा योजना, त्यानुषंगाने करावयाचे सामंजस्य करार तसेच खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावरील प्रकल्प, सोयीसुविधा निर्माण करणे, इत्यादी बाबतचे प्रस्ताव संचालनालयामार्फत वेळोवेळी शासनास सादर करण्यात येत असतात. तथापी बहुतांश वेळी सदर प्राप्त होणारे प्रस्ताव परिपूर्ण स्वरूपाचे नसल्याचे दिसून येते.

२. याविषयी विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व संस्थांचे लक्ष "वित्तीय अधिकार नियम पुस्तीका - १९७८, भाग पहिला, उप विभाग - एक ते पाच प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करणेबाबत" शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र - २०१३ / प्र.क्र. ३० / २०१३ / विनियम, भाग - २, दिनांक १७.०४.२०१५ , सोबतच्या नियम पुस्तिकेतील भाग पहिला, उपविभाग - तीन मधील अनुक्रमांक ४ , परिच्छेद क्रमांक २७ (२), " योजनेला किंवा प्रस्तावाला प्रशासकीय (वित्तीय मंजुरी धरून) मान्यता देणे" मधील तरतुदींकडे वेधण्यात येत आहे. याविषयी विभागास प्राप्त होणाऱ्या योजना /

प्रस्तावाच्या खर्चाच्या बाबींच्या प्रस्तावास विभागास प्रकरणपरत्वे नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय घेवून त्यानुसार सदर प्रस्तावांना शासनाची मान्यता घेणे आवश्यक असते.

३. प्रस्तुत विषयी उपरोक्त नमूद बाबींच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करतांना प्रस्तावित योजना / प्रस्तावाचा उद्देश, आवश्यकता/ तातडी, सविस्तर प्रकल्प / योजना अहवाल, योजना प्रकार (केंद्र पुरस्कृत/केंद्रिय/बाह्यसहाय्यित/राज्यस्तरीय/जिल्हा स्तरीय), केंद्र वा अन्य संस्थेचा सहाय्य कालावधी, दोन्ही पक्षकाराच्या दायित्वाच्या बाबी, सदर योजनेमुळे राज्य शासनावर निर्माण होणाऱ्या आर्थिक व अन्य दायित्वांच्या बाबी, त्यासाठी बाबनिहाय येणारा भांडवली (आवर्ती व अनावर्ती) किंवा महसुली (आवर्ती/अनावर्ती) स्वरूपाचा खर्च, प्रस्तावित खर्चाचे नियोजन, सदर योजना/ प्रस्तावाची तांत्रिकद्ष्टया योग्यता / व्यवहार्यता, सामंजस्य कराराची आवश्यकता असल्यास सदर करारातील तरतूदी, योजनापरत्वे शासनाची होणारी आर्थिक बचत, आर्थिकदृष्टया सुसाध्यता, प्रस्तावपरत्वे आर्थिक / सामाजिक / शैक्षणिक फायदे, योजनेचा कालावधी, नवीन पदनिर्मीतीची आवश्यकता आहे किंवा कसे, असल्यास त्याचा तपशील व वार्षिक भार, बाह्य सहाय्यित प्रकल्प असल्यास निधी उपलब्धतेसाठी नमूद अटी व शर्ती , शासनाच्या प्रचलित आदेश, शासन निर्णय, परिपत्रक, सीव्हीसी मार्गदर्शक तत्वे, कॅगचे निर्देश इत्यादीचे पालन होते किंवा कसे, तसेच योजनेत नमूद विषयाच्या अनुषंगाने विभागाच्या नियंत्रणाखालील असलेल्या संस्थेतील सोयीसुविधा, इत्यादी तसेच शासनाने वेळोवेळी निर्देश दिलेल्या बाबींच्या माहितीचा समावेश असलेले परिपूर्ण प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्याची दक्षता घ्यावी.

४. याविषयी शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रस्तावित योजना / प्रस्तावास शासन मान्यतेची आवश्यकता असतांना संचालनालय / संस्था वा अन्य स्तरावरून योजना / नवीन बाब प्रस्तावास परस्पर मान्यता देवून केंद्र शासन, निमसरकारी, खाजगी संस्था,इत्यादी सोबत सामंजस्य करार करण्यात येवू नये. सदर स्वरूपाची बाब शासनाच्या निदर्शनास आल्यास अशा प्रकरणी संबधितांना जवाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८०२१७१७३९९४१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARUN MURLIDHAR RAO DAHALE

Digitally signed by ARUN MURLIDHARRAO DAHALE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, serialNumber=30df743755280cf26ce97ec0978235f63f80f0bc4317129bf381eb48778f2e3d, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARUN MURLIDHARRAO DAHALE
Date: 2019.08.02 17:49:04 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
४. सर्व अधिष्ठता, शासकीय वैद्यकीय/ दंत/ आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय
५. संचालक - प्राध्यापक, मानसिक आरोग्य संस्था, पुणे
६. सर्व सहसचिव / उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय , मुंबई
७. सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय , मुंबई
८. निवडनस्ती (प्रशा-१)